| MKCL Creating a Knowledge Lit World www.mkcl.org | Subject – भूगोल | Model Answer Set – 2 |
|---|---|---|

**प्र.१ (अ) दिलेल्यापर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:**

१) अ) विकसनशील   क) हिमालय   क) विषुववृत्त   अ) माळढोक

**प्र.२ योग्य जोड्या जुळवा.**

| ‘अ’ गट (प्रदेश) | | ‘ब’ गट (प्राणी) | |
|---|---|---|---|
| १) | बंगालचा वाघ | अ) | पश्चिम बंगाल |
| २) | एक शिंगी गेंडा | ब) | आसाम – दलदलीच्या प्रदेशात |
| ४) | सिंह | क) | गुजरात |
| ४) | गंगेतील डॉल्फिन | ड) | गंगा नदीच्या खोऱ्यात |


**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही - ४)**

१) भारताच्या दक्षिणेला हिंदी महासागर आहे.
२) माराजॉ बेटे हे दोन नद्यांच्या मुखादरम्यान आहे
३) ब्राझीलमध्ये पर्जन्यछायेच्या प्रदेशाला अवर्षण चतुष्कोण म्हणतात.
४) हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, उत्तरराखंड, बिहार आणि राजस्थान राज्यात नागरीकरण कमी झाले आहे.
५) अटलांटिक महासागराच्या किनारी भागातील बेटे प्रवाळ बेटे आहेत.

**प्र.४ (अ) नकाशाचे काळजीपूर्वक वाचन करुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार)**

१) भारतातील ६००० मीटरपेक्षा जास्त उंची असलेला भाग उत्तर दिशेस आहे.
२) गडद हिरव्या रंगाने दाखवलेला उत्तरेकडील भूमीचा उतार पूर्व दिशेस आहे.
३) पूर्व घाटातील शिखराचे महेंद्रगिरी आहे.
४) सह्याद्री पर्वताची उंची उत्तर दिशेने वाढत जाते
५) अरवली पर्वत उत्तर दिशेला पसरला आहे
६) भारत व श्रीलंका यांना विभाजीत करणाऱ्या सामुद्रधुणीचे नाव पाल्कची सामुद्रधुनी असे आहे.

**(ब) नकाशात खालील बाबी भरा. (कोणतेही चार)**




**प्र.५ खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही - २)**

१) १) उत्तर भारतीय मैदानी प्रदेश नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाच्या निक्षेपणाने तयार झाला आहे.
२) या मैदानी प्रदेशात सुपीक मृदा आहे.
३) या मैदानी प्रदेशातील नद्या बारमाही वाहतात.
४) सुपीक मृदा व पाण्याची उपलब्धता त्यामुळे उत्तर भारतीय मैदानात शेती व्यवसाय केला जातो.

२) १) मॅनॉस हे शहर ॲमेझॉनास राज्यातील आहे.
२) मॅनॉस हे ॲमेझॉनच्या सदाहरित वनांच्या मध्यभागी असलेले शहर आहे.
३) मॅनॉसमध्ये विषुववृत्तीय मान्सून हवामान आहे.
४) या शहरातील तापमान वर्षभरात खूप जास्त वाढत नाही किंवा कमी होत नाही.
५) इथे वर्षभर पाऊस पडत असतो त्यामुळे तापमानात खूप मोठा बदल होत नाही.

३) वन्य प्राणी प्रजाती परिस्थिती हाच एक मुख्य घटक आहे. त्यामुळे परिस्थितिकीतील कोणत्याही प्रजातीस हानी पोचवल्यास विनाशक स्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून वन्य प्राण्याचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे.

४) १) सागरी मार्ग आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खूप महत्त्वाचे असतात.
२) जलवाहतूक कमी खर्चात होते, जलमार्ग बंधावे लागत नाही.
३) खनिजे, अवजड यंत्रसामग्री, कोळसा, धान्ये इ. वजनाने जड असलेल्या मालाची वाहतूक जलमार्गाने करणे सोयीचे असते.
४) विसाव्या शतकातील तांत्रिक विकासामुळे स्वयंचलित जहाजे बांधण्यात आली.

५) जहाजांवर शीतगृहे व इतर सोयी असल्यामुळे नाशिवंत वस्तूही दूरदूरच्या देशात पाठविणे सहज शक्य झाले म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गावर अवलंबून राहावे लागते.

**प्र.६ अ) दिलेल्या आकृत्यांचे निरीक्षण करून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)**

१)

| **खनीजाचा प्रकार** | **खनीज** | **प्रदेश** |
|---|---|---|
| खाणकाम | लोहखनिज, मँगनीज, निकेल, तांबे, बॉक्साइड | ब्राझीलचा पूर्व भाग |

२) ब्राझील देशाचा अंतर्गत भाग अॅमेझॉन नदीचे खोरे या भागातील खाणकाम व्यवसाय विकसीत झाला नाही. (पारा राज्यातील भाग) कारण या भागात दुर्गमता, घनदाट अरण्ये, सुप्त खनिज यासंबंधीचे अज्ञान इत्यादी प्रतिकुल घटकांमुळे.

३) खनिजांची उपलब्धता लक्षात घेता उद्योगांचा विकास उच्चभूमी प्रदेशातील खाणकाम व्यवसाय विकसीत झाला आहे.

४) १) थंड व उष्ण प्रवाहांचा संगम २) विस्तार्ण भूखंडमंच यामुळे दक्षिण अटलांटिक किनाऱ्या लगत मासेमारीचे उत्कृष्ट क्षेत्र लाभले आहे.

किंवा

**आ)दिलेल्या आकृत्यांचे निरीक्षण करून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)**

| **संबंधित उद्योगधंदे** | **या उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल** | **कच्चा माल उपलब्ध होणारी ठिकाणे** |
|---|---|---|
| तेल आणि नैसर्गिक वायू उत्पादन | खनिज तेल | मुंबईच्या किनारपट्टीतील भागात |
| दुग्धोत्पादन | दूध | गोरेगाव (पूर्व) |
| स्टील उत्पादक | लोखंड,खनिज | खमम (तेलंगणा) |

| | | |
|---|---|---|
| जेन निर्मिती | लोखंड आणि स्टिल | इस्को स्टील प्लँट, असनसोल<br>टाटा स्टील, जमशेदपूर |
| नेक व खत उद्योग | रॉक फॉस्फेट,<br>सल्फर, सल्फ्युरिक<br>ॲसिड, मिथेनॉल | महाराष्ट्रातील ट्रॉंबे<br>आणि थळ<br>(रायगड) |
| उत्पादन | पतंगाचा कोष | कर्नाटक, आंध्र प्रदेश,<br>तामिळनाडू,<br>जम्मू काश्मिर |

**प्र.७ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) १) क्षेत्रभेटीसाठी एखादे क्षेत्र निवडताना आपण आपल्या क्षेत्रभेटीचा उद्देश निश्चित केला पाहिजे.
२) क्षेत्र अभ्यासाचे उद्दिष्ट कोणते आहे? निवडलेले क्षेत्र प्राकृतिक किंवा सांस्कृतिक आहे याची पूर्व कल्पना असावी लागते.
३) क्षेत्र अभ्यासासाठी किती वेळ लागेल, त्या क्षेत्रापर्यंत जाण्यासाठी कोणते वाहतूक मार्ग व वाहतूकीची साधने आहेत याचा विचार करुनच क्षेत्र निवडावे लागत.

२) १) भारतकडे एक विकसित बनण्याची क्षमता असलेले राष्ट्र म्हणून जग पाहू लागले आहे.
२) स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने अलिप्त राष्ट्रांचा गट स्थापन करण्यात पुढाकार घेतला.
३) सार्क संघटनेच्या स्थापनेत भारताने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.
४) संयुक्त राष्ट्रे, जागतिक व्यापारी संघटना, आग्नेय आशियायी राष्ट्र संघटना, संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेविधी, जागतिक बँक अशा अनेक संघटनांचा भारत सदस्य आहे.

३) वन्य प्राणीजीव : भारतात व ब्राझील मध्ये वन्य प्राण्याच्या अनेक प्रजाती आपणास दिसून येते. दलदलीच्या प्रदेशा ॲनाकोंड आढळतो. मगरी, सुसरी, माकडे, प्युमा व बिबट्या आढळतो आणि भारतात नद्या, खाड्या व किनाऱ्यावरील प्रदेशात कासव, मगर, सुसर इत्यादी प्राणी आढळतात. ब्राझील मधील कोंडोर हा खूप उंचावर उडणारा मोठ्या आकाराचा पक्षी विविध प्रकारचे पोपट, मकाव व फ्लेमिंगो या पक्षाच्या प्रजाती आढळतात. लक्षावधी प्रकारचे कीटक हे सुद्धा येथे आढळतात. या विविधतेमुळे ब्राझील मधील वन्य जीवन अतिशय समृद्ध आहे तर भारतात मोर, खंड्या, तितर, कबुतरे विविधरंगी पोपट पाणथळ जागी बदके, बगळे व गवताळ प्रदेशात माळढोक सारखे पक्षी आढळतात.

भारत हा वैशिष्टपूर्ण वन्यप्राणी असलेल देश म्हणून ओळखला जातो.

नैसर्गिक वनस्पती : भारतात सरासरी २००० मिमि जास्त पर्जन्यमान होते. भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या भागात सदाहरित वने आढळतात तर ब्राझीलमध्ये वर्षभर पाऊस पडतो तसेच विषुववृत्तीय वने आढळतात. ब्राझीलमध्ये ज्या प्रदेशात पाऊस ठराविक काळात पडतो त्या ठिकाणी वृक्षांची घनता कमी. त्या ठिकाणी गवत खुरटी झुडेपे व काटेरी वनस्पती आढळतात. भारतात ज्या भागात दीर्घकाळ कोरडा उन्हाळा व ५०० मिमि पेक्षा कमी पर्जन्य होतो तेथे काटेरी व झुडुपी वने आढळतात. त्यात खैर, बाभूळ व खेजडी वृक्ष आढळतात. ब्राझीलमध्ये सदाहरित, निमसदाहरित, शुष्क इ. वनस्पतींचा समावेश होतो. तर भारतात पानझडी वृक्ष, सदाहरित वृक्ष, काटेरी वनस्पती, दलदलीच्या प्रदेशात भारतात समुद्रकाठची वने, संद्रीची वने व खारफुटीची वने आढळतात.

४) १) माहिती व संदेशाची देवाण घेवाण म्हणजे संदेशवहन होय.

२) आधुनिक संदेशवहनामुळे देशातील तसेच जगातील कोणत्याही ठिकाणी अल्पावधीत संपर्क साधने शक्य आहे.

३) जगाच्या एखाद्या भागात घडणाऱ्या घटना काही क्षणांतच दूरदर्शनच्या पडद्यावरुन अनेकांपर्यत पोहोचतात.

४) उदा. टेलीफोन, पत्रिका, दुरध्वनी, इत्यादी

*This question paper is for practice purpose only.